**धरण**

बाई मी धरण धरण धरण बांधते
माझं मरण मरण मरण कांडते

झुंजू मुंजू ग झालं
पीठ जात्यात आटल
कणी कोंडा ग कोंडा ग कोंडा ग रांधीते

दिस कासऱ्याला आला जीव मागं घोटाळला
तान्हं लेकरू लेकरू  पाटीखाली घालते

काय सांगू उन्हाच्या झळा, घाव खाली फुटे शिळा
कढ दाटे कढ दाटे पायी पाला मी बांधिते

पेरा पेरात साखर, त्याचं पिकलं शिवार
घोटभर पाण्यासाठी सारं रान धुंडळाते

येल मांडवाला चढे, माझ्या घामाचे ग अढे
माझ्या अंगणी अंगणी अंगणी पाचोळा ग पडे

**दया पवार**